**महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील पूलांचे नियतकालीक परिरक्षण करण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत सूचना. पूलांचे संरचानात्मक परीक्षण (Structural Audit) व पूलांच्या दुरुस्तीच्या कामांना मंजूरी देण्यासंदर्भातील इमारतीच्या संरचनात्मक परीक्षण (Structural Audit) बाबत मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**शासन परिपत्रक क्र- संकीर्ण-२०१६/प्र.क्र-३८९/रस्ते-१**

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक: १० जानेवारी, २०१८

<u>वाचा:</u>

१) सार्वजनिक बांधकाम विभागाचे परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र-३८९/रस्ते-१ दि १९/८/२०१६

२) सार्वजनिक बांधकाम विभागाचे अर्धशासकीय पत्र क्र. सकीर्ण-२०१७/प्र.क्र-५३९-ब/रस्ते-१ दि १२/२/२०१७

**<u>प्रस्तावना:</u>**

**(१) पूलांबाबत:-**

राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील रस्त्यांवरील पूलांची व इमारतींची नियतकालिक तपासणी करणे व आवश्यक दुरुस्त्यांची कामे तातडीने हाती घेऊन पूर्ण करण्याचे काम सा.बा.विभागामार्फत करण्यात येते. या संदर्भात पुलांबाबत कार्यवाही करण्यासाठी अनुसरण्यात यावयाच्या कार्यपध्दतीबाबत शासनाने दिनांक १९.८.२०१६ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. या सूचनांप्रमाणे कार्यवाही प्रगतीत आहे.

निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांसंदर्भात काही बाबीबाबत स्पष्टीकरण सादर करणे आवश्यक असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली आहे. तसेच पूलांच्या दुरुस्तीची कामे हाती घेण्यासाठी रुपये ५० लक्ष रकमेपर्यतच्या पूलाच्या दुरुस्तीचे काम मंजूर करण्याचे अधिकार शासनाने दिनांक १३/२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये मुख्य अभियंता यांना प्रदान केले आहे. या अधिकारामध्ये वाढ करणे तसेच प्रादेशिक विभागाच्या अखत्यारीतील कार्यक्षेत्रातील पूलांच्या दुरुस्तीसाठी मंजूर करावयाच्या कार्यक्रमाची वार्षिक

वित्तीय मर्यादा निश्चित करण्याची बाब ही शासनाच्या विचाराधीन आहे. यासंदर्भात सविस्तर अभ्यास करुन यापूर्वी निर्गमीत केलेल्या सूचनांमध्ये काही सुधारणा करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्याबाबत तपशील पुढील प्रमाणे आहे.

१) शासन परिपत्रक दि.१९/८/२०१६ मधील सुचनांसदर्भात पूलांचे संरचानात्मक परीक्षण (Structural Audit) करण्यासंदर्भात सुधारीत मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे आहेत-

अ) शासनाने निर्गमित केलेल्या दिनांक १९.८.२०१६ रोजीच्या शासन परिपत्रकामध्ये बाब क्र. ४ मध्ये नमूद केलेल्या परीरक्षणासाठीच्या तज्ञ संस्था/शैक्षणिक संस्था/ खाजगी तज्ञ सल्लागार यांच्याकडून संरचनात्मक परिक्षणाचे काम करताना पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

ब) मुख्य अभियंता यांनी त्यांच्या प्रादेशिक विभागातील पूलांच्या नियतकालिक तपासणीमध्ये प्राप्त झालेले निष्कर्षाचा आढावा दरवर्षी माहे जून व माहे डिसेंबर महिन्यामध्ये दरवर्षी घ्यावा. या आढाव्यामध्ये ज्या पूलांचे संरचनात्मक परिक्षण करणे आवश्यक ठरेल अशा पूलांची यादी प्रसिध्द करुन सर्व संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन दयावी.

क) प्रत्येक पाच वर्षांनी मोठया पूलांचे संरचनात्मक परिक्षण होईल याची काळजी घेण्यात यावी.

ड) संरचनात्मक परिक्षण करताना खाली नमूद तपशीलाप्रमाणे संबंधित अभिकरणामार्फत परिक्षण विहित नियमांचे पालन करुन पूर्ण करावे.

| **अ.क्र.** | **पूलाची लांबी** | **परिक्षण करणाऱ्या संस्थेचा वर्ग** |
|---|---|---|
| १ | २५० मीटर पर्यंत | नामांकित empanelled तांत्रिक सल्लगार / कंपन्या |
| २ | २५० मीटर ते ५०० मीटर | नामांकित अभियांत्रिक महाविद्यालये |
| ३ | ५०० मीटर पेक्षा जास्त लांबी | आयआयटी /सीआरआरआय,नवी दिल्ली |

**(२)** शासन अर्धशासकीय पत्र दि.१३/२/२०१७ अन्वये पूलांच्या दुरुस्तीची कामे मंजूर करण्याबाबत निर्गमीत केलेल्या सूचनांमध्ये बदल पुढील प्रमाणे करण्यात येत आहे.

अ) प्रत्येक जिल्ह्यासाठी रस्ते दुरुस्ती व देखभालीसाठी उपलब्ध होणाऱ्या निधीमधील १०% इतका निधी पूलांच्या दुरुस्तीच्या कामांसाठी राखीव ठेवण्यात यावा.

ब) प्रादेशिक विभागामधील पूलांच्या दुरुस्तीच्या कोणत्याही कामास रुपये १ कोटी रकमेपर्यंतच्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्याचे अधिकार मुख्य अभियंता यांना प्रदान करण्यात येत आहेत.

क) प्रादेशिक विभागाअंतर्गत दरवर्षी मंजूर करण्यात येणाऱ्या पूलांच्या दुरुस्तीची एकूण किमंत वरील बाब क्र. अ मध्ये नमूद किमंतीपेक्षा कोणत्याही परिस्थितीत जास्त होणार नाही याची जबाबदारी मुख्य अभियंता यांची राहील. या वित्तीय मर्यादेतच मुख्य अभियंता यांना कामे मंजूर करण्याचे अधिकार राहतील.

ड) वरील बाबींच्या कोणत्याही पध्दतीच्या विचलनासाठी शासनाची परवानगी प्राप्त करुन घेणे आवयक राहील.

इ) कामांना मंजूरी देताना प्राधान्यक्रम विचारात घेऊन मंजूरी प्रदान करण्याची जबाबदारी मुख्य अभियंता याची राहील.

शासन परिपत्रक दि.१९/८/२०१६ व शासन अर्धशासकीय पत्र दि.१३/२/२०१७ मधील उपरोक्त बाबींव्यतीरीक्त इतर सर्व सूचना कायम राहतील.

**(३) इमारतींबाबत:-**

इमारतींचे संचरचनात्मक परिक्षण (Structural Audit) करण्याबाबतच्या सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | इमारतींचे क्षेत्रफळ | परिक्षण करणारी यंत्रणा/ संस्था |
|---|---|---|
| १ | २५०० चौरस मिटरपर्यंत | नामांकित empanelled तज्ञ सल्लगार |
| २ | २५०० चौरस मिटरपेक्षा जास्त | आयआयटी / VJTI, VNIT, COEP |

उपरोक्त सुचनाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी दक्ष रहावे.यामध्ये कुचराई करणाऱ्या अधिकाऱ्याविरुध्द योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०११०१५३२३०४५१८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

C V Bhatkhande

Digitally signed by C V Bhatkhande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Works Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0b1e69c845ea0d8097d6c6057154f411ad937502168fce2f0ac043de142e0826, cn=C V Bhatkhande
Date: 2018.01.10 15:40:20 +05'30'

**( चं. वि. भातखंडे )**

कार्यकारी अभियंता तथा अवर सचिव

**प्रत,**

१) सर्व मुख्य अभियंता,सार्वजनिक प्रादेशिक विभाग,

२) सर्व अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ,

३) सर्व कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग/जिल्हा परिषद विभाग,

सर्व तांत्रिक अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.